मोटार अपघात न्यायाधीकरण, केळापूर, जिल्हा यवतमाळ यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी प्र. बा. नाईकवाड)

**मोटार अपघात दावा क्र.४/२०१८**
CNR No.: MHYA080011932016

१. श्रीमती शालीनी विठठल नांदेकर,
२. सुशील विठठल नांदेकर,
३. साहिल विठठल नांदेकर,

क्र.२ व ३ अज्ञान पालन कर्ती
आई अर्जदार क्र.१ मार्फत.

४. चंद्रभागा गजानन नांदेकर,

**.. विरुध्द ..**

१. मेजर सिंग जागीर सिंग,
२. लखविंदर सिंग बलविंदर सिंग,
३. दि न्यु इंडीया ॲशुरंस कं.लि.

**निशाणी २ चे अर्जाखालील आदेश**
(पारीत दिनांक ०३—०१—२०२२)

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मोटार वाहन कायदयाचे कलम १४० अंतर्गत, अर्जदार क्र.२ व ३ चे वडील व अर्जदार क्र.४ चा मुलगा व अर्जदार क्र.४ चा पती नामे विठठल गजानन नांदेकर यांचे मोटर वाहन अपघातात निधन झाल्याबाबत अंतरीम नुकसान भरपाई मिळण्याकरिता केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन की, दिनांक १५.११.२०१७ रोजी मयत विठठल हे सायंकाळी ७.०० वाजताचे दरम्यान त्याचे मोटार सायकलने वणी येथून मारेगांव येथे येत असतांना त्यांचे पाठीमागून येणा—या ट्रेलर ट्रक क्र. सी.जी.—०७/बी.ई—७०३७ चे चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने व

निष्काळजीपणाने चालवून विठठल यांचे मोटार सायकलला जोरात धडक दिल्यामुळे विठठल यास गंभीर दुखापत झाली होती व परिणामी त्याचा मृत्यू झाला. सदरचा अपघात हा गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवल्यामूळे झाला होता. त्यामुळे गैरअर्जदार हे अर्जदारांना अंतरीम नुकसान भरपाई देण्यास जबाबदार ठरतात व सदरची नुकसान भरपाई मिळविण्यास अर्जदार हक्कदार आहेत. करिता त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

३. गैरअर्जदार क्र.३ याने त्यांचा लेखी जबाब नि. १७ प्रमाणे दाखल करून अर्जदारांची मागणी फेटाळली. अर्जदारांनी केलेले कथन त्याने अमान्य केले. गैरअर्जदाराचे कथन की, घटनेचे वेळी मयत विठठल हा त्याची मोटार सायकल एमएच–२९/डी–५२२० ही भरधाव वेगाने व चुकीच्या दिशेने चालवित होता व त्यामूळे विठठलचे त्याचे मोटार सायकलवरील नियंत्रन सुटले होते व त्याचेच चुकीमूळे अपघात झाला आहे. सदरचा अपघात हा गैरअर्जदाराचे चुकीमूळे झालेला नाही. विठठल याचेकडे घटनेचेवेळी मोटार वाहन चालविण्याचा परवानासुध्दा नव्हता. त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करावा.

४. मी दोनही विद्वान वकीलांचा युक्तीवाद तसेच अर्जदारांनी दाखल केलेले दस्त म्हणजेच एफ.आय.आर., घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, अपघात अहवाल, विमा पॉलीसी व ट्कचे नोंदणीबाबतचे दस्त लक्षात घेतले असता, हे स्पष्ट होते की, घटनेचेवेळी गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून विठठलचे मोटार सायकलला धडक दिल्यामूळे त्यास गंभीर दुखापत होवून तो मरण पावला. दाखल दस्तांवरून हे सुध्दा स्पष्ट होते की, गैरअर्जदार क्र.२ हा सदरचे ट्कचा नोंदणीकृत मालक आहे.

५. त्यामुळे दाव्यात दाखल असलेले दस्तावरून हे स्पष्टपणे सिध्द होते की, विठठल याचा मृत्यू मोटार वाहन अपघातात झालेला असून सदरचे अपघातात गैरअर्जदारांचे मालकीचे मोटार वाहनाचा समावेश आहे व गैरअर्जदारांचे निष्काळजीपणामूळे सदरचा अपघात घडला आहे. गैरअर्जदारांनी जरी कथन केले की, सदरचा अपघात हा विठठल याचे निष्काळजीपणामूळे घडला आहे, तरीसुध्दा प्रस्तूतचे अर्जाचे स्वरूप पाहता कलम १४० मोटार वाहन कायदा तहत अंतरिम नुकसान भरपाई मंजूर करतेवेळी कोणाच्या बेजबाबदारपणामूळे व निष्काळजीपणामूळे अपघात घडला, हे पाहणे गरजेचे नसते, कारण मुळातच अंतरिम नुकसान भरपाई ही कुणासह दोष न देता मंजूर करावी असे कायदयाचे तत्व आहे. त्यामूळे प्रस्तूतचा अर्ज निकाली काढतेवेळी फक्त एवढेच पाहणे गरजेचे असते की, मयत हा मोटार अपघातात मरण पावला आहे व अर्जदार हे त्याचेवर अवलंबून आहेत किंवा नाही, तसेच ते त्याचे वारस आहेत किंवा नाही. दाखल दस्तांवरून प्रथमदर्शनी हे स्पष्टपणे सिध्द होते की, विठठलचा अपघाती मृत्यू झाला आहे व अर्जदार हे त्याचे वारस असून त्याचे उत्पन्नावर अवलंबून आहेत. अर्जदार क्र.२ व ३ विठठलची अपत्ये, व अर्जदार क्र.४ विठठलची आई तसेच अर्जदार क्र.१ ही विठठलची पत्नी असल्यामूळे निश्चीतच ते त्याचे उत्पन्नावर अवलंबून होते व त्याचे वारस आहेत. त्यामूळे निश्चीतच त्यांना सदरचा अर्ज दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

६. गैरअर्जदार क्र.२ हा अपघातात सामील असलेल्या सदर वाहनाचा नोंदणीकृत मालक असल्यामूळे त्यास त्याची जबाबदारी टाळता येणारी नाही. त्यामूळे अर्जदार हे गैरअर्जदारांकडून अंतरीम नुकसान भरपाई मिळविण्यास पात्र ठरतात व गैरअर्जदार हा अर्जदारांना अंतरीम नुकसान भरपाई अदा करण्यास बांधील ठरतात. करिता सरतेशेवटी मी खालील आदेश पारीत करतो.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांनी स्वतंत्रपणे व संयुक्तपणे अर्जदारांना अंतरीम नुकसान भरपाईची रक्कम रू.५०,०००/– हा आदेश पारीत केल्याच्या तारखेपासून दोन महिन्याचे आत अदा करावी अन्यथा गैरअर्जदार हे अर्जदारांना सदरचे रक्कमेवर शेकडा ९ टक्के साधे दराने व्याज देण्यास जबाबदार राहतील.

३. सदर रक्कमेपैकी अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकूण रू.४०,०००/– व अर्जदर क्र.४ हीस रू.१०,०००/– देण्यात यावे.

४. गैरअर्जदारांनी सदरहू वरील रक्कम प्रत्येक अर्जदारास कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेच्या धनादेशाद्वारा अदा करावी.

५. येणेप्रमाणे अंतरिम अवार्ड तयार करावा.

(प्र. बा. नाईकवाड)

दिनांक : ०३.०१.२०२२.

सदस्य,

मोटार अपघात न्यायाधीकरण, केळापूर.